# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 29/06/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत १२ कि.मी अंतरावर मौजा पाटनसावंगी येथे दिनांक २८/०६/२०२३ चे ००.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— **१) मोहम्मद हैदर निजामदीन अंसारी, रा. भगवानपूर टोल शांतीपूर ता. बोचाहा बिहार ह. मु. पाटणसावंगी २) मोहम्मद अबीश अंसारी रा. भगवानपूर टोल शांतीपूर ता. बोचाहा बिहार ह मु पाटणसावंगी ३) रूरेश सूरेश राय सर्व रा. भगवानपूर टोल शांतीपूर ता. बोचाहा बिहार ह. मु. पाटणसावंगी** यांनी संगनमत करून जखमी नामे —राम बापु माटोई वय २८ वर्ष याचे सोबत पैसे कमी दिल्याचे कारणावरून वादविवाद करून झगडा भांडण सूरू केले व शिवीगाळ सुरू करून आरोपी क्र. १ याने जिव घेण्याचे उद्देशाने पोळी सेकन्याचा तावा जखमीच्या डोक्यावर मारून त्यास गंभीर जखमी केले व फिर्यादी नामे— राजकुमार रामसेवक पासवान, वय ३२ वर्ष, रा. भगवान पूर टोले शांतीपूर ता. बोचाहा जि. मूज्जफरपुर बिहार ह. मू. पाटणसांवगी यांना सुध्दा मध्यस्थी आल्याने मारहान केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. भस्मे मो. नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. सावनेर :— दिनांक ११.०६.२०२३ चे १६.०० वा. ते दिनांक २८.०६.२०२३ चे १०.०० वा. दरम्यान आरोपी नामे— अनिरूद्ध कोमल घोष, वय २४ वर्ष, रा. टिकाम गढ याने मागील एका वर्षा पासुन फिर्यादी/पिडीता वय १६ वर्ष हिचे सोबत इंस्टाग्रामवर जवळीक साधुन ओळख पटविली. तिचे व तिच्या सर्व परीवाराची माहीती घेवुन, त्यांची इन्स्टाग्रामवरच चॅटींग सुरू झाली. प्रेम सबंध जुळले. ते एकमेकांना ओळखु लागले. यातील आरोपीने यातील फिर्यादीचे पिडीत मुलीच्या अल्पवयाचा फायदा घेत लग्नाचे आमीश देवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन सावनेर येथे आपले बजाज पल्सर मोटर सायकलने येवुन पिडीतास घेवुन पळवुन नेले व तिचेवर (मध्यप्रदेश) येथे नेवुन अनुसूचीत जमातीची असल्याचे आणि अल्पवयीन असल्याचे माहीत असुन ही तिचेवर आरोपीने वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३६६, ३७६(२)(एन), ३७६(२) (जे) भादवि. १८६०, सहकलम ४, ६ बालकांचे लैंगीक अपराधा पासुन संरक्षण कायदा—२०१२, सह कलम 3 (2) (5), 3(1) (w) (i) (ii) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम सुधारीत—२०१५ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन सावनेर करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर